नियमित फौजदारी खटला क्र.३००/२०२०
निशाणी क्र. १०

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक – १**

मी सत्यप्रतिज्ञेवर निवेदन करते की,

माझे नाव - प्रविण भागुजी कराळे,
वय - ४२ वर्षे, नोकरी - पोलीस मुख्यालय, पुणे शहर,
सध्या रा. - पुणे.

**सरतपासणी सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही. आर. बकाल यांचेमार्फत**

१. दि. ०४.०७.२०२० रोजी खडकी पोलीस स्टेशन अंतर्गत तपास पथकात कार्यरत होतो. कर्तव्यावर असताना पो. हवालदार ठोकळ व आम्हाला माहिती मिळाली की खडकी बाजारातील पाण्याच्या टाकीखाली एक महिला बेकायदेशीर अमली पदार्थ विक्री करत आहे. त्यानंतर वरिष्ठांच्या आदेशाने मी , उप-निरीक्षक गिरी साहेब, स. पो. उ. नि. तापकीर, पो. ह. ठोकळ, म. पो. शि. पोखरकर आणि पो. शि. सोनावळे दोन पंचासह छापा टाकण्याच्या साहित्यासह रवाना झालो. पंच आल्यानंतर स. पो. नि. ठाकुर यांनी आमच्या सर्वांची झडती घेतली तसेच पंचांची देखील झडती घेतली. सदर झडतीमध्ये काही मिळुन न आल्याने आम्ही रवाना झाला. आम्ही दुपारी ३.५० वाजता केस डायरीमध्ये नोंद करुन पोलीस स्टेशनमधुन सरकारी वाहनाने रवाना झालो. खडकी बाजारात पाण्याच्या ठिकाणी पोहोचल्यावर आडोशाला माहिती मिळालेल्या ठिकाणी उभे राहिलो. त्याठिकाणी एक महिला कापडी पिशवी घेवुन थांबलेली दिसली. बातमीप्रमाणे उभी असलेली बाई तीच असल्याची खात्री पटली. त्यानंतर सदर बाईला आम्ही तीचे नाव विचारले असता तिने मंगल प्रविण चांदणे असे नाव सांगितले. आम्ही सदर महिलेला झडती घेण्याबाबत विचारले असता तीने नकार दिला. तिच्याकडे असलेलया कापडी पिशवीत आठ प्लास्टीकच्या

पुडया होत्या. त्यात गांजा होता. सदर कापडी पिशवीचे आठ प्लॅस्टीकच्या पिशवीसहीत आमच्या वजनकाट्यावर वजन केले असता ते १५९ ग्रॅम एवढे भरले. त्यातील काही गांजा हा केमिकल अॅनालायझरकडे तपासणीकामी पाठविण्यासाठी नमुना म्हणुन बाजुला काढला तो सील करुन त्यावर पंचांच्या सहया घेतल्या. त्याप्रमाणे ए. पी. आय ठाकुर यांनी जप्ती पंचनामा करुन त्यावर दोन पंचांच्या सह्या घेतल्या. सदर मुद्देमालाबाबत त्या महिलेकडे चौकशी केली असता ती तो स्वतःच्या फायद्यासाठी विक्री करत असल्याचे निर्दशनास आले. त्यानंतर जप्त मुद्देमालासह आरोपीला ताब्यात घेवून आम्ही खडकी पोलीस स्टेशन येथे गेलो. तेथे मी आरोपीविरुदध एन. डी. पी. एस. कलम ८क,२०ब अन्वये तक्रार दिली. आता मला फियाद दाखविण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावरील सही माझी आहे. त्यास **नि. ११** देण्यात येते. त्या महिलेस पाहिल्यास ओळखू शकतो. ती आजरोजी गैरहजर आहे. सदर जप्त केलेलो मुद्देमाल मी पाहिल्यास ओळखू शकतो.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे श्री. नलावडे विधीज्ञ यांचेमार्फत**

२. मी कर्तव्यावर असताना सदर बातमी पो. ह. ठोकळ यांना मिळाली. सदर बातमी साधारण दुपारी ३ च्या दरम्यान मिळाली होती. ती बातमी मिळाल्यानंतर सदर बातमीदारास कार्यालयात हजर करुन घेवून त्यांनी दिलेली बातमी गिरी साहेबांनी स्टेशन डायरीला नोंद करुन घेतली. त्याप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्याचा लेखी आदेश दिला नाही. हे खरे आहे की, पाण्याच्या टाकीच्या ठिकाणी ब–याच लोकांचे हातगाडीवर व्यवसाय आहेत. तसेच बरेच दुकाने देखील आहेत.हे खरे आहे की, त्याठिकाणी सदर महिलेच्या आईचे भोलेनाथ या नावाचे छोटेसे दुकान आहे व त्याच्या पाठीमागे त्यांचे घर आहे. हे खरे आहे की, त्या दुकानाला लागुन तीन ते चार टपरी आहेत व रिक्शा स्टॅन्ड देखील आहे. हे खरे आहे की, बातमीची खात्री

करण्यासाठी बोगस गि–हाईक पाठविला नव्हता. हे खरे आहे की, आजुबाजूला असणा–या दुकानांमध्ये किंवा रिक्शा चालकांकडे चौकशी केली नाही. हे खरे आहे की, एखाद्या ठिकाणी दापा टाकण्यापुर्वी न्यायदंडाधिका–यांच्या सहीचे सर्च वॉरंट घ्यावे लागते ते या केसमध्ये घेतले नाही. हे खरे आहे की, सदर ठिकाणी भाजीमंडई असल्याने बरेच लोक जा – ये करत असतात.सदर महिलेची अंग झडती घेण्याबाबत विचारले असता तिची लेखी संमती घेतली नाही. हे खरे आहे की, ती अंगझडती घेताना तेथुन येणा–या जाणा–या लोकांपैकी कोणालाही सदर अंगझडतीचे पंच म्हणुन घेतले नाही. हे खरे नाही की, सदर जप्त केलेला मुद्देमाल हा अगोदरच सील केला होता. सील करण्याच्या पुर्वी मी तो मुद्देमाल पाहिला होता. हे खरे नाही की, सदर प्लास्टीकच्या पिशव्या बाजारात सहज उपलब्ध होतात. त्या पिशव्याची साईज सांगता येणार नाही. त्या कापडी पिशवीचे वर्णन सांगता येणार नाही. हे खरे आहे की, सदर वजनकाटा कोणाचा होता व मुद्देमालाचे वर्णन कोणी केले याचा उल्लेख फिर्यादीत नमुद नाही. सदर अमली पदार्थांबाबत माझे प्रशिक्षण झालेले नाही. हे खरे नाही की, सदर केसमधील दोन्ही पंचांवर खडकी पोलीस स्टेशन अंतर्गत गुन्हे दाखल आहेत. हे खरे नाही की, सदर पंच नेहमीचे आहेत. हे खरे आहे की, यातील एक पंच शुभम कांबळे हा सिध्दांत भिंगारे याच्या केसमध्ये पंच होता. हे खरे नाही की, घटनास्थळी गेल्यावर आम्ही ग्रुप पाडले होते. हे खरे आहे की, एखाद्या महिलेची अंगझडती घ्यायची असल्यास महिला पोलीस व महिला पंच आवश्यक असतात. हे खरे आहे की, फिर्यादीत पंचनामा किती वाजता सुरु करुन किती वाजता संपला हे नमुद नाही. सदर पंचनाम्याची एक प्रत आरोपीस दिली किंवा नाही हे मला आठवत नाही. हे खरे आहे की, सदर मुद्देमाल सील करताना लाखेवर कोणते नाव नमुद होते याचा उल्लेख फिर्यादीत नाही. हे खरे आहे की, सदर मुद्देमाल जप्त केल्यावर खडकी पो. स्टेशनच्या मुद्देमाल कारकुनकडे जमा केला. रासायनिक प्रयोगशाळेकडे जप्त मुद्देमालापैकी ८० ग्रॅम मुद्देमाल पाठवला. हे खरे आहे की, फिर्यादीत ८.५ ग्रॅम एवढा मुद्देमाल रासायनिक प्रयोगशाळेकडे पाठविल्याचे नमुद आहे. हे खरे आहे की, सदर छाप्याची संपुर्ण प्रक्रिया

करुन पोलीस स्टेशनला कधी परत आलो याची वेळ फिर्यादीत नमुद नाही. हे खरे आहे की, सरकारी वाहनाचा क्रमांक व त्याचा चालक याबाबत फिर्यादीत नमुद नाही. हे खरे नाही की, मुद्देमालाची संपुर्ण प्रक्रिया पोलीस स्टेशनला केली व तेथेच पंचांच्या सहया घेतल्या. हे खरे नाही की, सदर महिलेकडुन असा कोणताही बेकायदेशीर अंमली पदार्थ मिळुन आला नाही. हे खरे नाही की, कोटा पुर्ण करण्याचा आदेश वरिष्ठांनी दिलेला असतो. हे खरे नाही की, आरोपी विरुध्द खोटी फिर्याद दाखल केली. अटक पंचनाम्याचे पंच कोण होते हे मला सांगता येणार नाही. हे खरे आहे की, माझ्या फिर्यादीत नमुद केल्याप्रमाणे एकुण १८ प्लास्टीकच्या पिशव्या सदर कापडी पिशवीत मिळुन आल्या व त्या जप्त केल्या. हे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही की, सदर महिला स्वतःच्या फायदयाकरीता सदर मुद्देमाल विक्री करत असल्याचे मी खोटे सांगत आहे. मी एन.डी.पी. एसच्या छापा टाकण्याच्या किती प्रक्रियेमध्ये सहभागी होतो हे मला सांगता येणार नाही. हे खरे नाही की, मला खडकी बाजार येथील दुकाने याबाबत मला संपुर्ण माहिती आहे. हे खरे नाही की, सदर भोलेनाथ नावाचे दुकान हे आरोपी तिचे पती व सासु चालवितात.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

PRAJKTA SHIRISH APTE
Digitally signed by PRAJKTA SHIRISH APTE
Date: 2025.04.04 17:30:59 +0530

दिनांक – ०४/०४/२०२५

**(पी. एस. आपटे )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र. २, खडकी, पुणे.